2019 VI 19 | 0230 | Seat No. | | | | | |

Time : 1½ Hours

**SOCIAL SCIENCE—II (M)**

**(Geography & Economics)**

**Subject Code**

| S | 0 | 1 | 2 | B |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 4** **(Printed Pages : 7)** **Maximum Marks : 40**

*सूचना :* (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) प्रश्न पत्रिकेत **चार** मुख्य प्रश्न आहेत.

(*iii*) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहा.

(*iv*) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

(*v*) प्रत्येक प्रश्नाचा क्रमांक व उपक्रमांक स्पष्टपणे लिहीणे आवश्यक आहे.

1. (अ) खालील प्रश्नांखाली दिलेल्या बहुर्पायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा :

(*i*) खालीलपैकी कोणते जैविक साधनसंपत्तीचे उदाहरण आहे ? ½

(अ) पाणी

(ब) वनस्पती

(क) कोळसा

(ड) पवन

(*ii*) खालीलपैकी कोणत्या भूरुपाला 'खनिजांचे कोठार' असे म्हटले जाते ? ½

(अ) पर्वत

(ब) पठार

(क) मैदान

(ड) बेटे

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **15** शब्दांपर्यंत लिहा : 2

(*i*) कोणत्याही **दोन** दुर्मिळ प्रजातींची उदाहरणे लिहा.

(*ii*) 'राजस्थानमधील बहुतेक घरांमध्ये जमिनीखाली टंकाना लागूनच खोल्या बांधल्या जातात. का ?

(क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **20** ते **30** शब्दांपर्यंत लिहा : 4

(*i*) कायम स्वरूपी जंगलांची उद्दिष्ट्ये लिहा.

(*ii*) वाढत्या लोकसंख्येमुळे कशाप्रकारे पाणी टंचाई निर्माण झाली आहे ?

(ड) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा : 3

(*i*) काळ्या मृदेची तीन वैशिष्टे लिहा.

(*ii*) गुजरात, झारखंड आणि ओरिसामधील जमिनीच्या अवमूल्यनाची कारणे स्पष्ट करा.

2. (अ) खालील प्रश्नांखाली दिलेल्या बहुपर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा :

(*i*) खालीलपैकी भारतातील कोणत्या राज्यात मॅंगनीजचे फार मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते ? ½

(अ) गोवा

(ब) राजस्थान

(क) महाराष्ट्र

(ड) ओरिसा

(*ii*) खालीलपैकी कोणता उत्तम प्रतीचा घट्ट कोळसा आहे ? ½

(अ) ॲन्थ्रासाईट

(ब) लिग्नाईट

(क) बिटुमीनस

(ड) पीट

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **15** शब्दांपर्यंत लिहा : 2

(*i*) भूऔष्णिक ऊर्जा म्हणजे काय ?

(*ii*) व्हेन्स आणि लोडस यांच्यातील फरकाचा मुद्दा लिहा.

(क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **20** ते **30** शब्दांपर्यंत लिहा : 4

(*i*) सौर ऊर्जेचा वापर केल्यामुळे पर्यावरणाच्या संवर्धनाला कशी मदत होईल ?

(*ii*) डॉक्टर आम्हाला दररोज आहारामध्ये नाचणी खाण्याचा सल्ला का देतात ?

(ड) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा : 3

(*i*) भारतीय शेतीमध्ये कोणत्या तंत्रज्ञानविषयक आणि संस्थात्मक सुधारणा घडवून आणल्या आहेत ?

(*ii*) मळ्याच्या शेतीची वैशिष्ट्ये लिहा.

3. (अ) खालील प्रश्नांखाली दिलेल्या बहुपर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा :

(*i*) खालीलपैकी कोणत्या उद्योगामध्ये कच्चा माल म्हणून चुनखडीचा उपयोग करतात ? ½

(अ) ॲल्युमिनिअम

(ब) सिमेंट

(क) खत

(ड) रासायनिक

(*ii*) खालीलपैकी कोणते सर्वात वेगवान आणि आरामदायी वाहतूकीचे माध्यम आहे ? ½

(अ) रेल्वेमार्ग

(ब) रस्तेमार्ग

(क) हवाईमार्ग

(ड) जलमार्ग

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **15** शब्दांपर्यंत लिहा : 3

(*i*) सीमा रस्ते महत्वाचे का आहेत ?

(*ii*) खनिजांवर आधारित उद्योग म्हणजे काय ?

(*iii*) जगातील अनेक लोक गोव्याला भेट का देतात ?

(क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **20** ते **30** शब्दांपर्यंत लिहा : 4

(*i*) गोव्यातील रस्तेमार्गाला भेडसावणाऱ्या दोन मुख्य समस्या लिहा.

(*ii*) सुती कापड उद्योग महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये का एकवटलेला आहे ?

(ड) तुम्हाला पुरविलेल्या भारताच्या नकाशात खालील बाबी दाखवा. तुम्ही वापरलेल्या चिन्हांची सूची तयार करा : 2

(*i*) गुजरातमधील सुरत येथील सुती कापड उद्योग

(*ii*) आंध्रप्रदेशातील विशाखापट्टणम येथील लोह-पोलाद कारखाना

(*iii*) जम्मू-काश्मिरमधील श्रीनगर येथील सॉफ्टवेअर तंत्रज्ञान पार्क

(*iv*) केरळमधील तिरुवनंतपुरम् आंतरराष्ट्रीय विमानतळ

4. (अ) खालील 'अ' गटात अर्थव्यवस्थेचे विभाग व 'ब' गटात त्यांची उदाहरणे दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : 1

| **गट 'अ'** | **गट 'ब'** |
|---|---|
| (*i*) प्राथमिक विभाग | (अ) वाहतूक |
| (*ii*) द्वितीय विभाग | (ब) जंगल व्यवसाय |
| | (क) साखर |
| | (ड) बँकिंग |

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **15** शब्दांपर्यंत लिहा : 3

(*i*) देशांच्या तुलनेच्या संदर्भात देशाचे एकूण उत्पन्न हा तितकासा उपयोगी पडणारा निकष का नाही ?

(*ii*) कोणता घटक अधिकाधिक महिलांना विविध नोकऱ्या करण्यासाठी प्रवृत्त करू शकेल ?

(*iii*) खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्रामधील फरकाचा मुद्दा लिहा.

(क) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **20** ते **30** शब्दांपर्यंत लिहा : 4

(*i*) माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान जागतिकीकरणास कशी मदत करत आहेत ?

(*ii*) अनौपचारिक कर्जपुरवठा विभागाकडून कर्ज घेतल्यावर कोणते तोटे आहेत ?

(*iii*) COPRA (कोप्रा) कायद्यान्वये जिल्हा आणि राज्यपातळीवर तीन सदस्यांची एक न्यायालयीन यंत्रणा कसे कार्य करते ?

(ड) खालील तक्त्यात 2014 ते 2017 वर्षामधील भारतातील खरीप आणि रब्बी हंगामातील अन्नधान्याचे उत्पादन दिले आहे. त्याचा अभ्यास करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

| **वर्ष** | **खरीप** (दशलक्ष टनामध्ये) | **रब्बी** (दशलक्ष टनामध्ये) |
|---|---|---|
| 2014 | 129 | 128 |
| 2015 | 126 | 126 |
| 2016 | 125 | 126 |
| 2017 | 138 | 135 |

(*i*) कोणत्या वर्षात खरीप पिकाचे उत्पादन जास्त होते ? 1

(*ii*) वर्ष 2016 मध्ये रब्बी पिकांचे उत्पादन खरीप पिकांपेक्षा किती जास्त होते ? 1